ISSN : 2348-7143
February 2019
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 112 : भारताच्या राजकीय व आर्थिक जडण-घडणीत महिलांचा सहभाग

# आंतरराष्ट्रीय राजकारणात शक्तीशाली राष्ट्र म्हणून भारताच्या उभारणीत इंदिरा गांधींचे योगदान (१९६६ ते १९७३)

– प्रा. शरद अर्जुन वाघ
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला, विज्ञान व वणिज्य महाविद्यालय,
मनमाड. ता. नांदगांव जि. नाशिक

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरुनी आखलेले परराष्ट्र धोरण हे भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलभुत चौकट मानली जाते. भारताच्या कोणत्याही पंतप्रधानाने या धोरणांचाच पुरस्कार केलेला दिसून येतो. भारताचे परराष्ट्र धोरण आदर्शवादाच्या तत्वावर आधारलेले दिसून येते. परंतु परराष्ट्र धोरणाची निर्मीती कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्राच्या हिताच्या संरक्षणासाठीच करत असते. देशाचा विकास व राष्ट्राची शक्ती यांच्यात वाढ करण्याचा प्रयत्न परराष्ट्र धोरणातून केला जातो. यासाठी परराष्ट्र धोरणात वास्तवदर्शी वदल करने अतिशय गरजेचे असते. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने मित्र व शत्रू या संकल्पना बदणाऱ्या असतात. म्हणूनच आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीच कोणाचे कायम मित्र किंवा शत्रू नसते. प्राप्त परिस्थीतीनुसार मित्र व शत्रू ठरत असतात.

भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्या पित्याने अर्थात पंडित जवाहरलाल नेहरुनी आखलेल्या आदर्शवादी धोरणाचे रुपांतर आदर्शवादाकडून वास्तववादाकडे केले. आंतराष्ट्रीय धोरणाचे विश्लेषक श्री.व्ही.पी.दत्त यांनी आपल्या अ सेंटेनरी हिस्टरी ऑफ द काँग्रेस या ग्रंथात इंदिरा गांधी यांच्या परराष्ट्र धोरणाचा उल्लेख 'अतिशय परिपक्व व देशाचे कमीत कमी नुकसान करणारे' असा केला आहे. त्यांनी भारताच्या अतिशय संकटग्रस्त व नाजूक काळात देशाच्या सीमांचे व देशहिताचे रक्षण केले. पाकिस्तान सारख्या भारताच्या कायम शत्रूराष्ट्राचा लष्करी पराभव करुन त्यादेशाचे दोन तुकडे केले व भारताच्या दिर्घकालीन हिताची जोपासना केली. महासत्ता व शक्तीशाली असणाऱ्या देशांचा कुटनितिक व नैतिक पराभव करुन आंतराष्ट्रीय राजकारणात देशाला शक्तीशाली राष्ट्र म्हणून मान्यता मिळवून दिली. त्यांच्या खंबीर व दूरदृष्टीच्या नेतृत्वानेच भारताच्या राष्ट्रीय हिताचे संरक्षण होवू शकले. भारताची एकता, एकात्मता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य भारताच्या इतिहासात नेहमीच लक्षात ठेवले जाईल.

२१ जून १९७५ रोजी घोषीत केलेल्या राष्ट्रीय आणिबाणीचा काळा डाग त्याच्या कार्यकाळाला लागला असला तरी १६ वर्षाच्या त्यांच्या पंतप्रधान कार्यकाळात त्यांनी देशाच्या विकासात दिलेल योगदान कायम स्मरणात ठेवले जाइल. दोन टप्यात त्यांचे परराष्ट्र धोरण समजून घेवू.

**१. पहिला टप्पा १९६६ ते १९७०:-**

सोव्हिएत संघातील ताश्कंदला पूर्व पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींच्या निधनामुळे इंदिरा गांधींना पंतप्रधन पद स्वीकारवे लागले. तत्पूर्वी १९६५ मध्ये पाकिस्थान बरोबर लढलेल्या युध्दामुळे भारताची आर्थिक परिस्थीती बिकट झाली होती. १९६६ मध्ये देशात दुष्काळ पडला होता. ही परिस्थीती सावरताना त्याच्या नेतृत्वाचा कस लागत होता. त्यात सहकारी पक्षांची मर्जी सांभाळणे सरकार टिकवण्यासाठी आवश्यक होते. या पार्श्वभूमीत त्यांना आपले परराष्ट्र धोरण ठरवून अमलात आणायचे होते. त्यांनी पद स्वीकारल्यानंतर पहिली भेट १२ ते १६ जुलै १९६६ साली सोव्हिएत संघाला दिली. या भेटीत त्यांनी सोव्हिएत संघ व भारत परस्परांचे कायम मित्र असतील असे सांगितले आणि आपल्या कार्यकाळात अनेक वळणे येवूनही त्यांनी शब्द पाळलेले दिसून येतात. रशियन राज्यक्रांतीच्या वार्षीक कार्यक्रमात १९६७ साली इंदिरा गांधींनी सहभाग घेतला. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या दोन बिगर साम्यवादी देशात भारताला निमंत्रण देण्यात आले होते. परंतू सोव्हिएत संघाने याच काळात पाकिस्थानशीही संबंध वाढवण्यावर भर दिला. जुलै १९६८ मध्ये सोव्हिएत संघाने पाकिस्तानला सैनिकी मदत देण्याचा निर्णय जाहिर केला. त्यामुळे भारताचे सोव्हिएत संघाशी संबंध निर्माण करण्यावर प्रश्न उपस्थीत होवू लागले. त्यानंतरही इंदिरा गांधींनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या नाहीत तर सोव्हिएत संघाला आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी पत्र पाठवले पण त्याबरोबर भारत सोव्हिएत संघाशी असलेल्या संबंधावर याचा परिणाम होणार नाही अशी ग्वाही संसदेत दिली.

२० ऑगस्ट १९६८ मध्ये सोव्हिएत संघ व त्यांच्या मित्र राष्ट्रांनी मिळून झेकोस्लोवीया या राष्ट्रावर साम्यवादी धोरणात सुधारणा केल्याच्या विरोधात आक्रमण केले. त्यावेळी इंदिरा गांधींनी यावर दुख व्यक्त केले परंतु २२ ऑगस्टला संयुक्त राष्ट्रात निंदा ठरावावर मतदान करताना भारतीय प्रतिनिधींनी तटस्थ भूमिका घेतली. अमेरीकेने भारताच्या या निर्णयावर टिका करताना भारताने आता अलिप्तता धोरण सोडून दिले आहे का? अशी विचारणा केली. यावर संसदेत विरोधी पक्षांनी केलेल्या टिकेला उत्तर देताना इंदिरा गांधींनी आपण राजकीय वास्तवता समजून घेतली पाहिजे असे सांगितले. त्यानंतर सेव्हिएत संघाने भारतातील लडाख आणि नेफा प्रदेशातील काही भाग नकाशात चीनी भूमी म्हणून दाखवली त्या विरोधात भारताने निषेधाचे पत्र पाठविण्यात आले याचे उत्तर म्हणून सोव्हिएत संघाने चूक सुधारण्याचे वचन दिले परंतु ते करण्यास १९७१ वर्षापर्यंत वाट पहावी लागली.

२८ मार्च १९६६ मध्ये अमेरिकन अध्यक्ष जॉनसन यांच्या निमंत्रणावरुन इंदिरा गांधींनी अमेरिकेला भेट दिली व दुष्काळात अमेरिकेने दिलेल्या मदती बाबत त्याचे आभार मानले. याकाळात भारत व अमेरिकेत संबंध काही अंशी सुधारलेले दिसतात. परंतु



Scanned by CamScanner